रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ ई मेल आयडी - sceapune@gmail.com

---

जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/मतदान प्रत्यादेशित करणे/कृउबास/ २९३५/२०२३ दिनांक :-१८/०४/२०२३

निवडणूक प्राधान्य

**वाचावे** :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम २९

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ३३

४. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार)

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्याच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २९ मधील तरतुदीनुसार उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द होत असून निवडणूक लढविणारा उमेदवार म्हणजे ज्यांची नामनिर्देशन पत्रे अंतिमरित्या स्वीकारण्यात आली असतील आणि ज्यांनी आपली उमेदवारी विहीत मुदतीत मागे घेतली नसेल असा उमेदवार होय, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३३ मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणाऱ्या एखादया उमेदवाराचे निधन झाल्यास आणि त्याच्या मृत्यूची बातमी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदानाचा प्रारंभ होण्यापूर्वी मिळालेली असेल तर उमेदवाराच्या मृत्यूच्या वस्तुस्थितीबद्दल खात्री पटल्यानंतर मतदान प्रत्यादेशित करण्याचे अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्राप्त आहेत, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार निवडणूका सुरळीतपणे व मोकळया वातावरणात पार पाडण्यासाठी कायदा, नियम या मधील तरतुदीशी सुसंगत आदेश/निर्देश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत,

त्या अर्थी, प्राधिकरण मतदानापूर्वी उमेदवाराचे निधन झाल्यास मतदान प्रत्यादेशित करणे संदर्भात पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील मधील तरतुदीन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण मतदान प्रत्यादेशित करणे संदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

१. वैध नामनिर्देशित व्यक्तीचे निधन झाल्यास व त्याच्या मृत्युची बातमी नियम २९ नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर व मतदान प्रारंभ होण्यापूर्वी मिळाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियम ३३ नुसार मतदान प्रत्यादेशित करावे.

२. वैध नामनिर्देशित व्यक्तीचे निधन झाल्यास व त्याच्या मृत्युची बातमी नियम २९ नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द होण्यापूर्वी मिळाल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियम ३३ नुसार मतदान प्रत्यादेशित करू नये.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने**

(डॉ. पी. एल. खंडागळे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रति,**

जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) तथा निवडणूक निर्णय अधिकारी (कृ.उ.बा.स.)

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा. प्रधान सचिव (सहकार) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.